वृत्तपत्राचे नांव :- पुढारी
वृत्तपत्र प्रकाशन ठिकाण :- कोल्हापूर
वृत्तपत्र पान नं.:- 1, 2
दिनांक :- 07-06-2008.
कटिंग नंबर: ........................

# प्राचीन वैदिक गणिताचा खजिना लुप्त होण्याच्या मार्गावर

## शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवणारी पद्धत

* विद्यार्थ्यांसाठी जादूची कांडी
* संशोधन होण्याची आवश्यकता
* स्पर्धा परीक्षांसाठी महत्त्वाचे
* वीस तासांत पद्धत आत्मसात
* इंग्लंड, अमेरिकेत या पद्धतीचा वापर

**कोल्हापूर** (विजय पाटील) : गणित हा शब्द उच्चारला तरी त्यामधील जटिलतेने अनेकांना कसेसे होते. यामुळेच दहावी-बारावी या महत्त्वाच्या परीक्षांसह शाळांमध्येही या विषयांत नापास होण्याच्या प्रमाणात सतत वाढ होते. या सर्वांवर जादूई उपाय प्राचीन वैदिक गणित पद्धतीत आहे. मात्र ही पद्धतच शिक्षण क्षेत्रात अनोळखी असल्याने हा अस्सल भारतीय खजिना लुप्त होण्याच्या मार्गावर आहे.

ब्रह्मलीन स्वामी भारती कृष्ण तीर्थ या संन्यासी व्रतस्थाने या जादूई वैदिक गणिताच्या शास्त्राचा शोध लावला. या शोधाचे चार खंड इंग्रजी व संस्कृतमध्ये वैदिक मॅथेमेटिक्स या नावाने उपलब्ध आहेत. परंतु मूळ संस्कृत खंडाचे इंग्रजी भाषांतर समजायला कठीण असल्याने शिक्षण क्षेत्राने या पद्धतीची कधी दखल घेतलीच नाही. ही पद्धत अथर्व वेदातील माहितीवरून शोधण्यात आल्याचा उल्लेख ग्रंथामध्ये सापडतो.

आयुर्वेदाची महती पाश्चिमात्य जगाने आपल्याला सांगितल्यावर पटली. याप्रमाणेच लंडनच्या सेंट जेम्स इंडिपेंडंट स्कूल फॉर बॉईज येथे तसेच अमेरिकेतील काही इन्स्टिट्यूटमध्ये वैदिक गणित हा विषय अनिवार्य ठेवण्यात आला आहे. मात्र आपल्याकडे त्याचे महत्त्वच समोर आले नसल्याने ही पद्धतच ग्रंथामध्ये बंद आहे. वीस तासांत ही पद्धत आत्मसात करता येऊ शकते, असा यामधील तज्ज्ञांचा दावा आहे. मात्र मुळात यामधील तज्ज्ञांची संख्या देशभरात बोटावर मोजता येण्याइतकी आहे. स्पर्धात्मक परीक्षा (युपीएससी, एमपीएससी) बँक, विमा, रेल्वेच्या नोकऱ्यांसाठी गणित हा विषय सक्तीचा असतो. या परीक्षांमध्ये काही सेकंदात गणित सोडवावे लागतात. हे अशक्यप्राय वाटणारे आव्हान वैदिक गणित पद्धतीच्या वापरामुळे सहज पेलता येत असल्याने ही पद्धत जाणणारे अनेकजण अव्वल ठरू शकतात.

शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवणाऱ्या या पद्धतीचे चार खंड मूळ संस्कृत व भाषांतरित इंग्रजीमध्ये असले तरी ते उपलब्ध होत नाहीत. मराठीत यावर काही पुस्तके उपलब्ध आहेत. (पान २)

## प्राचीन वैदिक गणिताचा खजिना लुप्त होण्याच्या मार्गावर

त्या पुस्तकाच्या संदर्भाने अनेक विद्यार्थी स्वयंभू वृत्तीने यामध्ये संशोधन व अध्ययन करत आहेत. या पद्धतीची दखल घेऊन शासनाने संशोधनात्मक पावले उचलल्यास गणिताच्या बाबतीत विद्यार्थी आंतराष्ट्रीय पातळीवर चमकू शकतील. या पद्धतीचे अध्ययन करणारे प्रा. नामदेव चौगुले म्हणाले की, मी या पद्धतीचा सखोल अभ्यास करत आहे. सर्व विद्यार्थ्यांपर्यंत ही पद्धत पोहोचवण्यासाठी शिक्षकांना ही पद्धत शिकवण्याची सोय करण्याबरोबर विद्यार्थ्यांनाही हा स्वतंत्र विषय निर्माण केला पाहिजे. चौगुले यांच्यासह डी. एम. भोपळे, किरण कांबळे, शशीकांत जाधव या पद्धतीचे अध्ययन करत आहेत.